# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ८१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/१२/२०१७

**१) भांडण करुन चाकुसारख्या धारदार शस्त्राने मृतकावर वार करुन जिवानिशी ठार मारल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/१२/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने मृतक शुभम दादाराम ठवकर वय अंदाजे २२ वर्ष, रा. गांधी वार्ड बेला भंडारा यांचे फुलपॅन्टचे मागील खिशात हात घातल्याने मृतक व आरोपी यांच्यात भांडण झाल्याने आरोपीने मृतकशी वाद घालुन त्याचे छातीवर बसुन चाकुसारख्या धारदार शस्त्राने मृतकावर वार करुन त्यास जिवानिशी ठार मारले अश्या फिर्यादी कुणाल नरेंन्द्र गजभिये वय २६ वर्ष, रा. गौतम बुध्द वार्ड बेला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०२ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. ऊईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन अनाधिकृतपणे शालेय पोषण आहार चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/१२/२०१७ चे १०.०० ते १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन स्वत:चे लाभा करीता शालेय पोषन आहार शासकीय शाखेतील तांदुळ ३५,८० किलो ग्रॅम, किंमती १०,७४०/—रु. चा माल, तांदुळ विना संमत्ती विना परवानगीने अनाधिकृतपणे त्याचा मालकीचा ट्रक एमएच ३१ सीडी ५४१ ने कोठेतरी चोरुन घेवुन जात असल्याने फिर्यादी कुमारी मनिष उदाराम गजभिये वय ४० वर्ष रा. नाशीक नगर भंडारा (अधिक्षक शालेय पोषन आहार योजना प. सं. भंडारा) यांनी दिलेल्या चौकशी अहवाल व तोंडी रिपोर्ट नुसार पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३८०,३४ भादवी, सहकलम ३, ७ अत्यावश्यक वस्तु अधि. सन १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) महिलेच्या गळयातील मंगळसुत्र चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/१२/२०१७ चे १४.०० ते १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी वैश्याली भुपेन्द्र कांबळे ही विठ्ठल रुक्माई मंदीरात महाप्रसाद घेण्यास गेली असता फिर्यादीचे गळयातील मंगळसुत्र वजन ३.५ तोळे किंमती ४५,०००/—रु. हा तुटुन खाली पडल्याने तो मंगळसुत्र कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरी करुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) जिल्हा कामगार कृती दल धाड पथक यांची कारवाई . :—**

दिनांक १८/१२/२०१७ चे १३.३० वाजता दरम्यान यातील जिल्हा कामगार कृती दल धाड पथक भंडारा यांनी बागडे चायनीज कॉर्नर पेट्रोल पंप ठाणा येथे धाड टाकुण दोन बाल कामगार यांना ताब्यात घेवुन त्यांचे मालक आरोपी त्यांचे मालक आरोपी यांचेवर बाल कामगार प्रतिबंधक अधिनीयमान्वये फिर्यादी विशाखा विनायक बनकर वय ४३ वर्ष, सहकारी कामगार अधिकारी तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३(अ) बाल कामगार प्रतिबंधक अधिनीयम १९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोटगीर पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) घराचा समोरील दाराचा ताला तोडुन घरातील साहित्याची व नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक १६ + १७ /१२/२०१७ चे १७.०० ते १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा कुलुप कोणीतरी अज्ञात चोराने तोडुन आत प्रवेश करुन ठेवलेले २ तांब्याचे हंडे, एक कास्याचा ताट, १ लोटा तांब्याचा, ६ जर्मनी मोठे गंज, २ जर्मन घमिले, १ स्टील बॉटली, ६ नग पेटी कोट, व आलमारीतील नगदी २,०००/—रु. असा एकुण ११,६५०/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी रमेश लाकडुजी गिन्हेपुंजे वय ५६ वर्ष, रा. समृध्दी नगर तकीया वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :–**

दिनांक १८/१२/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रत्नदीप जवाहरलाल मेश्राम वय २८ वर्ष, रा. शहापुर याचे वडील जखमी जवाहरलाल लक्ष्मण मेश्राम वय ५५ वर्ष, रा. शहापुर हे त्याचे सायकलने शहापुर वरुन कवडसी फाटा येथे जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन जखमीचे सायकलला धडक मारुन डावे पायाला फॅक्चर करुन जखमी केल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**७) अवैधरित्या जनावरे कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/१२/२०१७ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे आपले पोलीस स्टॉपसह नाकाबंदी करीत असतांना मुखबीर कडुन खबर मिळाली की नमुद ट्रक मध्ये अवैध रित्या जनावरे भरुन एनएच ६ रोडने शहापुर कडुन नागपुर कडे जात असल्याची माहिती मिळाल्याने त्यास कवळसी फाटा येथे थांबवुन ट्रक चालकांस ट्रकचा मागील पल्ला उघडुन पाहाणी केली असता टढ़क मध्ये २० लाल रंगाचे व काळे पांढरे लाल ठिंपके असणारे बैल अवैध रित्या अपुऱ्या जागेत कोंबुन जनावरास त्रास होई अश्या स्थितीत वाहतुक करतांना मिळुन आले. बैल प्रत्येकी २५,०००/–रु. असा एकुण ५,००,०००/–रु. व ट्रक किंमती १०,००,०००/–रु. असा एकुण १५,००,०००/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. सार्वे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ९प्राणी संरक्षण अधिनीयम सहकलम ११(१), (घ)(ड) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्याचा प्रतिबंधक कायदा १९६० सहकलम ९ संरक्षण अधि. सहकलम ११९ मपोका सहकलम ८३ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**८) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १८/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, मोहाडी, कारधा, साकोली व लाखनी येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२४ लिटर हातभट्टी दारू + साहित्य + २ मोटार सायकल किंमती ७६,०५०/–रु. व ९ लिटर देशी दारु किंमती २४००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १३५/–रु. असा एकुण ७८,५८५/रु. चा माल जप्त करण्यात आला.

19.12

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.